महाराष्ट्र शासन

पशुसंवर्धन विभाग

पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-४११ ०६७.

सरळसेवेने भरावयाच्या पदांची जाहिरात

वेबसाईट https://ahd.maharashtra.gov.in

जाहिरात क्रमांक :- एनजीओ-५(४)/(प्र.क्र.९५९)/२०१६/ 640 / पसं-१, पुणे-६७, दिनांक : ०३/०७/ २०१७

पशुसंवर्धन आयुक्तालयाचे दि.११/३/२०१६ नुसार दिलेली जाहीरातीस शासनाने स्थगिती दिल्याने,सदरची जाहीरात रद्द करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१ दिनांक ०२.०६.२०१५,सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.२९०/का.१२ दिनांक १६/०७/२०१५,शासन पदुम विभाग यांचे पत्र क्रंमाक-पविआ-२०१५/प्र.क्र.५७१/पदुम-३,मंत्रालय मुंबई-३२, दिनांक २०/१/२०१७ व शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.६४/२०१५/वित्तीय सुधारणा-१ दिनांक १५.०१.२०१६ नुसार पशुसंवर्धन विभागाच्या आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य पुणे-६७ यांचे अधिनस्त गट-क संवर्गातील सरळसेवेची पदे भरण्यासाठी खाली नमुद केलेल्या रिक्त पदाकरिता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

**गट-क संवर्गनिहाय भरावयाच्या पदांचा तपशीलः-**

**पद क्र.१ : पशुधन पर्यवेक्षक** वेतनश्रेणी :- ५२००-२०२०० (ग्रेड वेतन रु. २४००/-)

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | भरावयाची एकूण पदे | महिला ३० % | माजी सैनिक १५ % | प्रकल्प-ग्रस्त ५ % | भुकंप-ग्रस्त २ % | खेळाडू ५ % | अंशकालीन १० % | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अराखीव (खुला) | ७६ | २३ | ११ | ४ | २ | ४ | ८ | २४ |
| २ | अनु.जाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | अनु.जमाती | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ४ | विमुक्त जाती (अ) | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ५ | भटक्या जमाती (ब) | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ६ | भटक्या जमाती (क) | ४ | १ | १ | ० | ० | ० | ० | २ |
| ७ | भटक्या जमाती (ड) | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ८ | विशेष मागास प्रवर्ग | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ९ | इतर मागास प्रवर्ग | २२ | ७ | ३ | १ | ० | १ | २ | ८ |
| | एकूण | ११४ | ३६ | १५ | ५ | २ | ५ | १० | ४१ |

टिपः-उपरोक्त पदामध्ये अपंग प्रवर्गासाठी ८ पदे अस्थिव्यंग (OL) व ८ पदे कर्णबधिर (HH) साठी आहेत.

**पद क्र.२ : वरीष्ठ लिपिक** वेतनश्रेणी :- ५२००-२०२०० (ग्रेड वेतन रु. २४००/-)

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | भरावयाची एकूण पदे | महिला ३० % | माजी सैनिक १५ % | प्रकल्प-ग्रस्त ५ % | भुकंप-ग्रस्त २ % | खेळाडू ५ % | अंशकालीन १० % | इतर (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अराखीव (खुला) | ५ | २ | १ | ० | ० | ० | १ | १ |
| २ | अनु.जाती | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३ | अनु.जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ४ | इतर मागास प्रवर्ग | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | एकूण | १० | ४ | १ | ० | ० | ० | १ | ४ |

**पद क्र.३ : लिपिक टंकलेखक** वेतनश्रेणी :- ५२००-२०२०० (ग्रेड वेतन रु. १९००/-)

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | भरावयाची एकूण पदे | महिला ३० % | माजी सैनिक १५ % | प्रकल्पग्रस्त ५ % | भुकंपग्रस्त २ % | खेळाडू ५ % | अंशकालीन १० % | इतर (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अराखीव (खुला) | ४ | १ | १ | ० | ० | ० | ० | २ |
| २ | अनु.जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३ | अनु.जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ४ | इतर मागास प्रवर्ग | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | एकूण | ७ | १ | १ | ० | ० | ० | ० | ५ |

**पद क्र.४ : लघुलेखक (उच्चश्रेणी)** वेतनश्रेणी :- ९३००-३४८०० (ग्रेड वेतन रु. ४४००/-)

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | भरावयाची एकूण पदे | महिला ३० % | माजी सैनिक १५ % | प्रकल्पग्रस्त ५ % | भुकंपग्रस्त २ % | खेळाडू ५ % | अंशकालीन १० % | इतर (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनु.जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | एकूण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

**पद क्र.५ : लघुलेखक (निम्नश्रेणी)** वेतनश्रेणी :- ९३००-३४८०० (ग्रेड वेतन रु. ४३००/-)

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | भरावयाची एकूण पदे | महिला ३० % | माजी सैनिक १५ % | प्रकल्पग्रस्त ५ % | भुकंपग्रस्त २ % | खेळाडू ५ % | अंशकालीन १० % | इतर (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अराखीव (खुला) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | एकूण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

**पद क्र.६ : वाहन चालक** वेतनश्रेणी :- ५२००-२०२०० (ग्रेड वेतन रु. १९००/-)

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | भरावयाची एकूण पदे | महिला ३० % | माजी सैनिक १५ % | प्रकल्पग्रस्त ५ % | भुकंपग्रस्त २ % | खेळाडू ५ % | अंशकालीन १० % | इतर (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अराखीव (खुला) | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| २ | अनु.जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३ | अनु.जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | एकूण | ५ | १ | ० | ० | ० | ० | ० | ४ |

**टिप- उक्त १ ते ६ संवर्गामध्ये अतिरिक्त संवर्ग कक्ष,विभागीय समायोजन,पदांचा आढावा वा अन्य कारणांमुळे पदसंख्येत(पदसंख्या कमी/जास्त होणे) व सामाजिक व समांतर आरक्षित पदांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.**

(१)शैक्षणीक अर्हता :-

**दिनांक ६.७.२०१७ रोजी खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.**

| अ क्र | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | पशुधन पर्यवेक्षक | पशुधन पर्यवेक्षक या पदासाठी खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता असणे आवश्यक आहे.<br>महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा( इयत्ता १० वी ) (एस.एस.सी) उत्तीर्ण झालेला असावा.<br>(i) जे माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण झालेले आहेत.<br>(ii)ज्यांनी पशुसंवर्धन आयुक्तालयाने चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील संविधानिक कृषि विद्यापीठाने चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापीठाने चालविलेल्या पशुधन पर्यवेक्षक अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेला आहे.<br>किंवा<br>(iii)ज्यांनी महाराष्ट्र राज्याच्या तंत्रशिक्षण परिक्षा मंडळामार्फत किंवा महाराष्ट्र राज्यातील सांविधानिक कृषि विद्यापीठाने किंवा महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापीठाने चालविलेला दोन वर्षाचा दुग्धव्यवसाय व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेला आहे.<br>किंवा<br>(iv)ज्यांनी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्यामार्फत चालविण्यात येणारा दोन वर्षाचा पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेला आहे.<br>किंवा<br>(v)ज्यांनी महाराष्ट्र राज्यातील संविधानिक कृषि विद्यापीठाची किंवा त्यास समतुल्य विद्यापीठाची बी.व्ही.एस.सी. किंवा बी.व्ही.एस.सी. अँड ॲनिमल हजबंड्री ही पदवी धारण केलेली आहे. |
| २ | वरीष्ठ लिपीक | महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी परिक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार. |
| ३ | लिपीक टंकलेखक | १. महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी परिक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार.<br>२. शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मंडळाकडील मराठी ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी ४० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण असलेले उमेदवार |
| ४ | लघुलेखक (उच्चश्रेणी) | १. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा ( इयत्ता १० वी ) (एस.एस.सी) उत्तीर्ण झालेले उमेदवार.<br>२. शासकीय वाणिज्य मंडळाची ईंग्रजी व मराठी १२० श.प्र.मि.लघुलेखनाची परीक्षा उत्तीर्ण असलेले उमेदवार<br>३. शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मंडळाकडील मराठी ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी ४० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण असलेले उमेदवार |
| ५ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | १. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा( इयत्ता १० वी ) (एस.एस.सी) उत्तीर्ण झालेले उमेदवार.<br>२. शासकीय वाणिज्य मंडळाची ईंग्रजी व मराठी १०० श.प्र.मि.लघुलेखनाची परीक्षा उत्तीर्ण असलेले उमेदवार |

| | | |
|---|---|---|
| | | ३. शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मंडळाकडील मराठी ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी ४० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण असलेले उमेदवार. |
| ६ | वाहन चालक | १. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा( इयत्ता १० वी ) (एस.एस.सी) उत्तीर्ण झालेले उमेदवार.<br>२. उमेदवाराकडे हेवि गुडस् वाहन/लाईट मोटार वाहन चालविण्याचा परवाना असावा.<br>३. उमेदवारास हेवि गुडस् वाहन/लाईट मोटार वाहन चालविण्याचा किमान ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. |

**(२) वयोमर्यादा :-** सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२ दि.२५/४/२०१६ अन्वये सर्वसाधारण खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता दिनांक ६.७.२०१७ रोजी वय वर्ष १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

| अ.क्र | आरक्षण/ समांतर आरक्षण | शासननियमानुसार आरक्षणांकरिता वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | मागासवर्गीय उमेदवार | ४३ वर्षे |
| २ | अपंग उमेदवार | ४५ वर्षे |
| ३ | प्रकल्पग्रस्त | |
| ४ | भुकंपग्रस्त | |
| ५ | शासकीय कर्मचारी | |
| ६ | सन १९९१ चे जनगणना/ सन १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी | |
| ७ | अपंग माजी सैनिक | |
| ८ | स्वातंत्र्य संग्राम सैनिकाचे नाम निर्देशित पाल्य | |
| ९ | अंशकालीन कर्मचारी | ४६ वर्षे |
| १० | खेळाडू उमेदवार | खुला व मागासवर्गीय प्रवर्ग ४३ वर्षे |

माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सवलत, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुद्धीपत्रक क्रमांकः मासैक-1010/प्र.क्र.279/10/16-अ, दिनांक 20 ऑगस्ट, 2010 प्रमाणे राहील.

**(३) समांतर आरक्षण :-**

**१.महिला समांतर आरक्षण :**

महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. ८२/२००१/ मसेआ/२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५ मे, २००१ मधील तरतुदीनुसार महिलांसाठी संबंधित सामाजिक प्रवर्गा अंतर्गत ३० टक्के समांतर आरक्षण अनुज्ञेय राहील. तथापि, संबंधित प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यासाठी आरक्षित असलेली पदे इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र पुरुष उमेदवारांमधुन भरण्यात येतील. खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमिलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षणा अंतर्गत अर्ज करणाऱ्या महिला उमेदवारांनी वर्ष २०१६-२०१७ कालावधी करीता व वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच ज्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ हवा असेल त्यांनी तशी मागणी ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे. **नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्राची व पात्रतेची मा.आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, पुणे यांच्याकडून पडताळणी करण्यात येईल व तदनंतरच पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.**

**(२) भुकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त :** भुकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी/ जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे लातूर/ उस्मानाबाद जिल्हयातील बाधीत गावातील भुकंपग्रस्त उमेदवारातून भरण्यात येतील.तसेच साप्रवि शासन निर्णय दि.४/११/२०१६ मध्ये नमुद केल्यानुसार,भुकंपग्रस्तांचे पात्र उमेदवार उपलब्ध झाले नाहीत,तर ती पदे प्रकल्पग्रस्तांसाठी वापरण्यात येतील.

**(३) खेळाडूसाठी अर्हता :**

१ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दि.१.७.२०१६ च्या शासन निर्णयामधील तरतुदी खेळाडू या समांतर आरक्षित पदांसाठी लागु राहतील.

२ खेळाडूने अर्ज करताना खेळाडुने राज्य/राष्ट्रीय स्पर्धेची प्रविण्य प्रमाणपत्रे विभागीय उपसंचालका कडुन प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे.व सदर पडताळणी प्रमाणपत्राची प्रत अर्जा सोबत असल्याशिवाय खेळाडूच्या अर्जाचा खेळाडू संवर्गातून विचार होणार नाही.

३ दि.१.७.२०१६ च्या शासन निर्णयामधील तरतुदी नुसार खाली नमुद केलेल्या गट क साठी पात्र क्रीडा स्पर्धा खालील प्रमाणे-

गट - अ व गट - ब पदाकरीता विहीत केलेली खेळ विषयक अर्हता धारण करणारा खेळाडू

अथवा

१. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा कनिष्ठ गट - अ) राष्ट्रीय ज्युनियर गट अजिंक्यपद स्पर्धा.
२. राज्यस्तर वरिष्ठ क्रीडा स्पर्धा - अ) राज्यस्तर वरिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा.
३. राज्यस्तर शालेय क्रीडा स्पर्धा
४. राज्यस्तर ग्रामिण व महीला क्रीडा स्पर्धा
५. राज्यस्तर आंतरविद्यापीठ स्पर्धा (अश्वमेध)
६. राज्यस्तर आदिवासी क्रीडा स्पर्धा
७. राज्यस्तर पॅराआफलिम्पिक क्रीडा स्पर्धा
८. राज्यस्तर अपंग क्रीडा स्पर्धा

टिप – वरील अ क्र १ ते ५ मधील सर्व क्रीडा स्पर्धा मधील खेळ हे ऑलंपिक क्रीडा स्पर्धा,एशियन गेम्स आणि कॉमन वेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दिबळ तसेच कब्बडी व खो-खो हे देशी खेळच ५ टक्के खेळाडू आरक्षणासाठी असतील.

**(४) अंशकालीन समांतर आरक्षण :**

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दि. २७.१०.२००९ अनुसार पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन सुशिक्षीत बेरोजगांराना अर्थसहाय्य या योजने अंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यन्त दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या उमेदवारांना सरळ सेवेने करावयाच्या नियुक्त्यामध्ये १० टक्के समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे. तसेच ३ वर्षापेक्षा कमी अनुभव असलेल्या उमेदवारास अंशकालीन या समांतर आरक्षणातून शासकीय सेवेत नियुक्ती देता येणार नाही याची नोंद घ्यावी.

**(५) अपंग:**

१ अपंग प्रवर्गातील उमेदवारांसाठी अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असणे आवश्यक असून तसे संबंधित जिल्हा शासकीय रुग्णालय अथवा प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र साक्षांकीत करुन अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

२ अपंगांचे आरक्षण महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग परिपत्रक क्र.न्यायाप्र-२०११/प्र.क्र.१२९/सुधार-३, दिनांक ४/८/२०११ व कृषि पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन आदेश क्र.पसंप्र-२०११/प्र.क्र.४, पदुम-१, मंत्रालय, मुंबई, दिनांक १० जानेवारी, २०१२ मधील तरतुदीनुसार अनुज्ञेय राहील.

**(६) माजी सैनिक :**

१ माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र, कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करावे लागेल. तसेच सशस्त्र दलातील किमान ६ महिने सेवा केलेल्या माजी सैनिका मधील त्यांनी सशस्त्र दलात केलेला अखंड सेवाकाल अधिक ३ वर्ष एवढा काल त्यांच्या

विहीत दिनांकाच्या वयातून वगळून त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल. अपंग माजी सैनिकांसाठी वयोमर्यादा ४५ वर्षे पुर्णपेक्षा अधिक नसावे. माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सवलत, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.मासैक-१०१०/ प्र. क्र.२७९/१०/१६-अ, दिनांक २० ऑगस्ट, २०१० प्रमाणे राहील.

२ शासन परीपत्रक पीआरअे-२००४/३८५५/प्रशा-१.१, दिनांक २ जुन,२००५ नुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये युध्द काळात व युध्द नसताना सैनिक सेवेत मृत्यू झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटूंबातील फक्त जवान किंवा अपंग जवानाची पत्नी यांना नियुक्ती देण्याचे धोरण आहे. त्यानंतर त्यांची अविवाहीत मुलगी/ मुलगा यांचा समावेश आहे व त्यांचा १५ टक्के समांतर आरक्षणामधुन विचार करण्यात येईल.

३ सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.मासैक-१०१२/प्र.क्र.१९८/१६-अ/मंत्रालय, मुंबई, दि.३०/४/२०१३ तरतूदीनुसार अनुज्ञेय राहील.

**(४) अधिवास दाखला :**

१ शासन निर्णय क्र.रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१०, दिनांक २७ जुन २०११ नुसार ज्या उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्मदाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अश्या प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

२ सदर उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अश्या प्रकरणात देखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

३ उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या उमेदवारासाठी लागू राहतील इतर उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र आवश्यक राहील. (Domicile Certificate)

**(५) कुटुंब प्रमाणपत्र :**

१ सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०००/प्र. क्र.१७/२०००/१२, २८ मार्च, २००५ व शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र. क्र.१७/२०००/१२, दि.०१ जुलै, २००५ नुसार विहीत केलेल्या नुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये शासनाने गट-अ ते गट-ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहीत नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र बंधनकारक आहे.

**(६) नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र :**

१ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ जानेवारी २००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगतगटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) आणि भ.ज.(ड), विशेष मागास प्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे अद्ययावत (नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**(७) जात वैधता प्रमाणपत्र :**

१ जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी-२०११/प्रक्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२/१२/२०११ मधील तरतुदीनुसार याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई न्यायालयाला औरंगाबाद खंडपीठाने दि.२५/८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एलएसपी मधील आदेशाच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

## (८) परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना :

शासन निर्णय वित्त विभाग क्र.अनियो/१०/०५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ नुसार दि.१ नोव्हेंबर, २००५ रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवारांना नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे म.ना.सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व म.ना.से. (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

(९) जाहीरातीत नमुद केलेल्या पदांचे आरक्षण बिंदू नामावली नोंदवही तपासणीनुसार व तपासणीस अधिन राहून दर्शविण्यात आलेले आहेत. बिंदू नामावली नोंदवहया फेरतपासणी अंती जाहिरातीतील पदांच्या संख्येमध्ये कमी/जास्त बदल होण्याची शक्यता आहे. **परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, आरक्षण याबाबत बदल करणे, परीक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे वा रद्द करणे आणि अशंत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मा.अध्यक्ष,राज्यस्तरीय निवड समिती तथा आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे हे स्वत:कडे राखुन ठेवत आहे.याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही.**

## (१०) परिक्षा शुल्क:-

सदर भरतीप्रक्रियेत खालील प्रमाणे परीक्षा शुल्क आकारले जाणार असुन सदर परीक्षा शुल्क हे नापरतावा राहील.

**परीक्षा शुल्क:-**

खालीलप्रमाणे शुल्क भरावे लागेल.

खुला प्रवर्ग - रु. 300 /- मागास प्रवर्ग - रु. 150/-

माजी सैनिक व अपंग उमेदवारांना परीक्षा शुल्क माफ आहे.

<u>टिप</u>: - चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेच्या शाखेत परीक्षा शुल्क भरल्यास रु. 40/- इतके प्रक्रिया शुल्क आकारले जाईल. सदर शुल्क उमेदवाराने भरावयाचे आहे.

नेटबँकिंग /डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड द्वारे ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्क भरल्यास निवडलेल्या पर्यायानुसार आवश्यक ते बँकेचे सेवा शुल्क भरावे लागेल.

## (११) ऑनलाईन अर्ज करण्याची पद्धत

१ प्रस्तुत पदांकरीता फक्त http://ahd.maharashtra.gov.in तसेच www.cahexam.com या अधिकृत संकेतस्थळावरुन विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी. व मोबाईल क्रमांक चूकिचा/अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्या द्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी. व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे हे जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

२ **११.३.२०१६ च्या जाहीरातीस अनुसरुन <u>www.cahexam.com</u>** या संकेतस्थळावरुन ज्या उमेदवारांनी परीपुर्ण ऑनलाईन अर्ज भरुन परीक्षा शुल्क भरलेले होते. अशा उमेदवारांनी दि. ६/७/२०१७ च्या जाहीरातीस अनुसरुन नव्याने ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहिल, परंतु अशा उमेदवारांना पुन्हा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. तसेच ज्या उमेदवारांना परीक्षा शुल्क माफ होते अशा (माजी सैनिक व अपंग) उमेदवारांनी देखील नव्याने ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहिल.

३ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज http://ahd.maharashtra.gov.in तसेच www.cahexam.com या या वेबसाईटद्वारे दि. 7.7.2017 रोजी दुपारी 12.00 पासून ते 26.7.2017 सायंकाळी 5.30 (24.00) पर्यंत या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

www.cahexam.com या संकेतस्थळावरुन ऑनलाईन अर्ज भरता येतील. अर्ज भरण्यासाठी उमेदवारास ऑनलाईन अर्जासोबत मदतीव्दारे (Help) सुचना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

५ उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांची पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपुर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी तसेच शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

६ उमेदवाराची लेखीपरीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखीपरिक्षेच्या प्राथमिक चाळणी नुसार गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी राखून ठेवलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

७ संकेतस्थळावर, ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरल्यानंतरच्या पुढील कार्यालयीन दिवशी खालीलपैकी कोणत्याही एका पद्धतीने परीक्षा शुल्क भरता येईल.

- स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) च्या कोणत्याही शाखेत **रोखीने चलनाद्वारे**.

**किंवा**

- SBI Collect द्वारे नेटबँकिंग /डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड वापरुन **ऑनलाईन पद्धतीने.**

संकेतस्थळावरुन प्राप्त होणा-या चलनाची प्रिंट काढून त्या चलनामार्फत चलनात नमूद असलेली आवश्यक ते शुल्क स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेमध्ये पुढच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी भरता येईल. सदरच्या 3 प्रतींपैकी उमेदवारास त्याची स्वत:ची प्रत, पशुसंवर्धन आयुक्तालय प्रत स्टेट बँक ऑफ इंडिया कडून परत मिळेल. त्यापैकी पशुसंवर्धन आयुक्तालय प्रत, उमेदवारांनी कागदपत्र छाननीचे वेळी पशुसंवर्धन आयुक्तालय यांचे कडे जमा करावी. सदर चलनाची मूळ प्रत असल्याशिवाय उमेदवाराची कागदपत्रे छाननी / मुलाखत घेतली जाणार नाही.

नेटबँकिंग /डेबिट कार्ड / क्रेडीट कार्ड द्वारे ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्क भरण्याच्या सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ऑनलाईन पद्धतीने परीक्षा शुल्क भरल्यास Payment Receipt जतन करुन ठेवा.

बँकेत परीक्षा शुल्क भरण्याचा कालावधी दिनांक 10.7.2017 ते दि. 28.7.2017 पर्यंत आहे.

परीक्षा शुल्क भरण्याच्या अंतिम दिनांका नंतर परीक्षा शुल्क भरणा-या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

वरीलपैकी कोणत्याही पद्धतीने परीक्षा शुल्क भरल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या दोन (2) दिवसानंतर www.cahexam.com या संकेतस्थळावर लॉग इन करुन उमेदवाराला परीक्षा शुल्क नोंदीची स्थिती तपासता येईल. तसेच अर्जाची प्रिंट काढता येईल.

८ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वत:चा अद्ययावत (Latest) विहित नमुन्यातील पासपोर्ट साईझ फोटो व सही स्कॅन करुन www.cahexam.com संकेतस्थळावरील सूचनेनुसार विहित पद्धतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

९ ऑनलाईन पध्दतीने एकदा भरलेल्या अर्जामधील कोणत्याही प्रकारच्या बदलाची विनंती विचारात घेतली जाणार नाही, अथवा अशा विनंतीस उत्तरेही दिली जाणार नाहीत.

१० उमेदवाराने ऑनलाईन भरलेल्या आवेदनपत्राची संगणकीय प्रिंटप्रत काढून त्यावर स्वाक्षरी करुन परिक्षा शुल्क भरणा केलेल्या चलनाच्या प्रतीसह स्वत:जवळ सांभाळून ठेवाव्यात.

११ ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारीख व वेळेनंतर संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

१२ ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परीक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रुपरेषा/ वेळापत्रक/ परिक्षाकेंद्र/ बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या (वेबसाईट) वर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

१३ अपंग संवर्गातील उमेदवाराकडे किमान अपंगत्वाचे प्रमाण 40 टक्के असल्याबाबतचे स्थायी वैद्यकीय मंडळाचे विहीत प्रमाणपत्र असावे. अपंग प्रवर्गातील पात्र उमेदवारांची अंतिम नियुक्ती ही स्थायी वैद्यकीय मंडळाच्या पात्रता प्रमाणपत्राच्या आधारे करण्यात येईल. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन परीपत्रक क्र न्यायप्र-२०१४/प्र क्र १/अ क्र २ दि १८.३.२०१४ नुसार दृष्टीहीन,अल्पदृष्टी,अस्थिव्यंग,सेलेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित झालेले उमेदवार लिहीण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परिक्षेसाठी लेखनिक पुरविण्याची तरतूद आहे. लेखनिकाची परिक्षेची शुल्क रक्कम रु १००/- चलनादवारे परीक्षाशुल्क व्यतिरीक्त भरावी व ती नापरतावा राहील. ज्या उमेदवारांनी लेखनिकाची अर्जात मागणी केलेली नसेल अशा अपंग उमेदवारांना ऐनवेळेस लेखनिक पुरविला जाणार नाही याची नोंद घ्यावी. अपंग प्रवर्गातील उमेदवारांची अंतिम नियुक्ती ही स्थायी वैद्यकीय मंडळाच्या पात्रता प्रमाणपत्राच्या आधारे करण्यात येईल.

१४ ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/ समाजकल्याण आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविलेली आहेत अशा उमेदवारांना विहित मुदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहिल. तसेच खेळाडू, प्रकल्पग्रस्त, अंशकालीन इत्यादी समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ ईच्छिणा-या उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत वेबसाईटवर स्वतंत्रपणे ऑनलाईन अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत अशा उमेदवारांना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

## (१२) निवडीची पध्दत :

१ परिक्षेतील प्रश्नाचे स्वरुप हे बहुपर्यायी वस्तुनिष्ठ राहील. उमेदवाराची निवड ही लेखी परिक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे, गुणवत्तेनुसार करण्यात येईल. एकापेक्षा अधिक उमेदवारास समान गुण प्राप्त झाल्यास सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.प्रानिम-१२१५/प्र.क्र.५५/१५/१३-अ, दिनांक ५/१०/२०१५नुसार निवड करण्यात येईल.

२ पद क्रमांक १ ते ६ करीता उमेदवारांची निवडीची पध्दत सविस्तर खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | पदनामा/संवर्ग | लेखी परीक्षा गुण | व्यवसायिक चाचणी गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| १ | पशुधन पर्यवेक्षक | २०० | -- | २०० |
| २ | वरीष्ट लिपिक | २०० | -- | २०० |
| ३ | लिपिक टंकलेखक | २०० | -- | २०० |
| ४ | लघुलेखक(उच्चश्रेणी) | १२० | ८० | २०० |
| ५ | लघुलेखक(निम्नश्रेणी) | १२० | ८० | २०० |
| ६ | वाहन चालक | ५० (चाळणी) | १०० | |

**लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे राहील.**

१ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिमं-१२१४/प्र.क्र.(४३/१४)/१३-अ, दिनांक ५/६/२०१४ मधील तरतूदीनुसार वरील पदांकरीता मुलाखत घेण्यात येणार नसल्याने लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड केली जाईल.

२ एखाद्या अर्जदाराने त्याची निवड करणेसाठी निवड समिती वरील अध्यक्ष, सदस्य तसेच अधिकाऱ्यांवर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून अपात्र ठरविण्यात येईल.

३ लेखी परीक्षेमध्ये फक्त काळ्या बॉलपेनचा वापर करणे बंधनकारक आहे.

४ लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील.

५ पशुधन पर्यवेक्षक पदाच्या लेखी परीक्षेचा दर्जा बारावी (HSC) व पदविका परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रत्येकी ३० याप्रमाणे १२० गुणांची व तांत्रिक विषयास ८० गुणांचे असे एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा राहील.

६ वरिष्ठ लिपिक पदाच्या लेखी परीक्षेचा दर्जा पदवी परिक्षेच्या दर्जाच्या समान राहील व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रत्येकी ५० याप्रमाणे २०० गुणांचे प्रश्न राहतील.

७ लिपिक टंकलेखक पदाच्या लेखी परीक्षेचा दर्जा पदवी परिक्षेच्या दर्जाच्या समान राहील व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रत्येकी ५० याप्रमाणे २०० गुणांचे प्रश्न राहतील.

८ लघुलेखक(उच्चश्रेणी) व लघुलेखक(निम्नश्रेणी)पदाच्या लेखी परीक्षेचा दर्जा माध्यमिक शालांत परिक्षेच्या (SSC) दर्जाच्या समान राहील व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रत्येकी ३० याप्रमाणे १२० गुणांचे प्रश्न राहतील.

९ वाहन चालक पदांसाठी १०० गुणांची व्यवसायीक (Driving Test) चाचणी व ५० गुणांची चाळणी परीक्षा (लेखी परीक्षा) चाळणी परीक्षेमधील प्रश्नांचा स्तर/दर्जा हा इ. १० वी या किमान शैक्षणिक अर्हतेनूसार तसेच वाहन चालक पदांसाठी आवश्यक असलेल्या कौशल्य तपासणीस पुरक असेल व अशा चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम २५ गुण सामान्य ज्ञान, २५ गुण कौशल्य तपासणी असे एकुण ५० गुण राहतील. प्रश्नाचा प्रकार- वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रत्येकी १ गुण प्रमाणे ५० प्रश्ने राहतील. चाळणी परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांचा विचार अंतीम निवडसुची तयार करताना करण्यात येणार नाही.

१० गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी किमान ४५ टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

११ उमेदवारांची मुलाखत घेण्यात येणार नसल्याने लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

१२ लेखी परिक्षा, कागदपत्रे छाननी इ. करिता प्रवेशपत्र, कार्यक्रम, विविध सुचना या केवळ संकेत स्थळावरुनच उपलब्ध करण्यात येतील पोस्टाव्दारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती/कार्यक्रम बाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

**पदांच्या निवडीसाठी कार्यपध्दती, अटी व शर्तीः-**

१ लेखी परीक्षेअंती उमेदवारांचे प्राप्त गुण, जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मुळ कागदपत्र पडताळणी करण्याकरीता अंतरीम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या उमेदवारांची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क मुळ कागदपत्रांच्या आधारे परीपुर्ण सिध्द होईल अशाच उमेदवारांचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्या करीता करण्यात येईल. जाहिरातीत नमुद केलेली संपूर्ण अर्हता, ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास उमेदवारांची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल अथवा अशाच उमेदवाराने मागितलेले सामाजिक आणि/किंवा समांतर आरक्षण अथवा वयोमर्यादा शिथिलीकरण, परिक्षा शुल्क इ. सारख्या सवलती नामंजूर करण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी.

२ अंतिम निवड शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिमं-१२१५/(प्र.क्र.५५/१५)/१३-अ, दिनांक ५/१०/२०१५ अन्वये

अ) उमेदवारांची अंतिम निवड ही लेखी परिक्षेत मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे केली जाईल.

ब) परीक्षेचा निकाल तयार करताना परीक्षेत ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येईल.

१ वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

२ समान वय असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतर शैक्षणिक अर्हता (पदव्युत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे) धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

३ वरील अनु.क्र.१ व २ या दोन्ही अटींमध्ये समान ठरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, सदर पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतम गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

३ विहीत वयोमर्यादेतील इच्छूक शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभाग प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**(१३) सर्वसाधारण महत्वाच्या सुचना**

१ अपंगासाठी असलेली पदे ही त्या संवर्गाच्या भरावयाच्या एकूण पद संख्येपैकी आहेत.

२ पशुसंवर्धन खात्याच्या https://ahd.maharashtra.gov.in व www.cahexam.com या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात व त्यामधील माहिती अधिकृत समजण्यात येईल.

३ जाहिरातीत नमूद केलेल्या पद संख्येत कमी/अधिक बदल होण्याची शक्यता आहे.

४ महिला, माजी सैनिक,प्रकल्पग्रस्त,भुकंपग्रस्त,खेळाडू,अंशकालीन कर्मचारी यांचेसाठी आरक्षित असलेली पदे संबधीत वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत.

५ अपंगांसाठी आरक्षीत असलेल्या पदावर सरळसेवेने भरती करतांना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे.याचा विचार न करता गुणवत्ता क्रमानुसार त्यांची निवड करण्यांत येईल व भरती केल्यानंतर सदर उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल त्या उपलब्ध सामाजिक प्रवर्गात सामावून घेण्यात येईल.

६ लेखी परिक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे, फक्त गुणवत्तेनुसारच निवड झालेल्या उमेदवारांना निवड समिती समोर कागदपत्रांच्या पडताळणीसाठी, खालील कागदपत्रांच्या मुळ प्रतीसह व छायांकित (साक्षांकित) प्रतीचा एक संच, निश्चित केलेल्या दिनांकास व वेळेत उपस्थित राहणे बंधनकारक आहे. जे उमेदवार उपस्थित राहणार नाहीत, त्यांच्या निवडीचा विचार केला जाणार नाही, याबाबत कोणतीही विनंती/तक्रार विचारात घेतली जाणार नाही. निवडसमितीचा निर्णय अंतिम राहील.

- शैक्षणीक अर्हता धारण करीत असल्याबाबतचे संबंधित प्रमाणपत्राच्या प्रती.
- शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परिक्षा मंडळाकडील टंकलेखन अर्हतेबाबतच्या प्रमाणपत्राची प्रत.
- उमेदवार महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र. मातंस 2012/प्र.क्र. 277/39 दिनाक 04 फेब्रुवारी 2013 मध्ये नमुद केलेल्यांपैकी संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असल्याबाबतचे संबंधित प्रमाणपत्राच्या प्रती.
- जन्मतारखे बाबतच्या पुराव्या दाखलच्या प्रमाणपत्राची प्रत.
- अनुभवाचे प्रमाणपत्राची प्रत.
- सक्षम प्राधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र.
- महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबतच्या सक्षम प्राधिका-याने दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत.
- प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त असल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्राची प्रत.
- लागू असल्यास सक्षम प्राधिका-याने दिलेल्या नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची प्रत.
- अपंगांचे बाबतीत जिल्हा शासकीय रुग्णालयाचे अथवा वैद्यकिय मंडळाचे प्रमाणपत्राची प्रत.
- महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ अन्वये उमेदवारांनी दि.२८.३.२००५ रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र नुमना-अ सादर करणे आवश्यक राहील. अर्जदार यांना हयात

असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८/३/२००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी उमेदवार/निवडीस /नियुक्तीस अपात्र ठरविला जाईल.

७ उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

८ ऑनलाईन अर्जाच्या सादर करण्यात आलेल्या प्रतीची छाननी करुन पात्र उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी प्रवेशपत्र ऑनलाईन पाठविण्यात येईल. तसेच पात्र उमेदवारांचे परिक्षेचे स्थळ, वेळ व दिनांक नंतर कळविण्यात येईल / प्रवेशपत्र संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

९ मागासवर्गीयांसाठी असलेले आरक्षण हे केवळ महाराष्ट्राचे रहिवासी असलेल्यांसाठी लागू राहतील. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र उमेदवाराने सादर करणे आवश्यक राहील.

१० महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्रंमाक ८२ /२००१/ म.से.आ २०००/ प्र.क्र.४१५/का-२,दिनांक २५ मे २००१ मधील तरतूदीनुसार राहील.खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे किमान ३१.३.२०१६ चे नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र/नुतनीकरण प्रमाणपत्र निवड समितीसमोर पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

११ अनुसूचित जाती व जमाती व्यतिरिक्त विजा-अ, भज-ब,भज-क,भज-ड तसेच इतर मागास आणि विशेष मागास प्रवर्ग यांना उन्नत व प्रगत गटाचे तत्व लागु करण्यात आले आहे. या प्रवर्गातील उमेदवारानी जात,उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक ३१.३.२०१७ चे वैध नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र/नुतनीकरण प्रमाणपत्र सामाजिक व न्याय विभाग शासन निर्णय दि.३०/६/२००६ मधील दिलेल्या नमुन्यात,कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. दिनांक ३१.३.२०१७ पुर्वीचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही.

१२ भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी/जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले व उमेदवारांचे नांव नमूद केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. भुकंपग्रस्त उमेदवारासाठी राखीव असलेली पदे लातूर/उस्मानाबाद जिल्हयातील ५२ बाधीत गावातील उमेदवारामधून भरण्यात येतील. तसेच साप्रवि शासन निर्णय दि.४/११/२०१६ मध्ये नमुद केल्यानुसार,भुकंपग्रस्तांचे पात्र उमेदवार उपलब्ध झाले नाहीत,तर ती पदे प्रकल्पग्रस्तांसाठी वापरण्यात येतील.

१३ लेखी परीक्षेस पात्र उमेदवारांना परीक्षेचा दिनांक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१४ उमेदवारांना लेखी परीक्षा, व्यावसायीक व शारीरीक चाचणीसाठी स्वखर्चाने यावे लागेल.

१५ शासकीय सेवेत नियमानुसार नियुक्ती झाल्यानंतर उमेदवाराला नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

१६ समांतर आरक्षणांतर्गत असलेले महिला, खेळाडू व अंशकालीन कर्मचारी या प्रवर्गातून उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या-त्या सामाजिक प्रवर्गातील उमेदवारामधून भरण्यात येतील.

१७ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९.३.२००३ अनुषंगिक सुधारीत शासन निर्णयान्वये उपरोक्त पदांकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संगणक हाताळणी/ वापराबाबतची खाली नमूद केलेली प्रमाणपत्रे त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाचे आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची सेवा कोणतीही पुर्व सूचना न देता समाप्त होईल.

a) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B किंवा C स्तर यापैकी कोणतीही परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र **किंवा,**

b) महाराष्ट्र राज्य उच्च तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

c) तसेच माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभाग शासन निर्णय क्र.मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९, दि.४/२/२०१३ मध्ये नमुद केलेली संगणक अर्हता प्राप्त करणे बंधनकारक राहील.

१८ विहित वयोमर्यादेतील इच्छूक शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभाग प्रमुखाच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत नियुक्तीचे वेळी सादर करावी लागेल.

१९ उमेदवार एकापेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करणार असल्यास,प्रत्येक पदासाठी विहीत नमुन्यात स्वतंत्र अर्ज करणेचा आहे.

२० सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

सदरची जाहीरात पशुसंवर्धन विभागाच्या https://ahd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

अर्जदारांना अर्ज भरण्यासंबंधी काही अडचण असल्यास त्यासाठी 9112886313 / 9112991189 या मोबाईल क्रमांकावर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संपर्क साधावा.

दिनांक : /७/२०१७
ठिकाण : पुणे-६७

अध्यक्ष तथा,
आयुक्त पशुसंवर्धन
महाराष्ट्र राज्य,औंध पुणे-६७.